(Details to be published on Website)

# सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

## सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

देशात निवडणूका अधिक पारदर्शक व्हाव्यात, तसेच राज्यामध्ये विविध निवडणूकांमध्ये साधनसंपत्तीचा गैरवापर प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याकरिता तसेच लोकसभा व विधानसभा निवडणूका एकत्रित घेण्याबाबतच्या सुरू असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने राज्यातील निवडणूकादेखील एकत्रित घेता येतील किंवा कसे याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/१३५/प्र.क्र.६५/ ३७, दि.२७ मार्च,२०१८ अन्वये मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली व्दिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगासह केंद्र व राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडे पत्रव्यवहार करणे. निवडणूकांसाठीची सज्जता तपासण्यासाठी विविध प्रधिकरणांकडून माहिती संकलित करणे इ . कामांसाठी तसेच समितीस सहाय्य करण्याकरिता राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील संवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांची करार पध्दतीने ६ महिन्याकरिता नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त जिल्हाधिकारी/उपसचिव | १ |
| २ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ |
| ३ | निम्नश्रेणी लघुलेखक | १ |
| ४ | तहसिलदार | १ |
| ५ | सहायक कक्ष अधिकारी | १ |
| ६ | लिपिक-टंकलेखक | १ |
| ७ | शिपाई | १ |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती ६ **महिन्यांकरिता** किंवा समितीचा अहवाल शासनास सादर होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीकरिता असेल.

२) सदर नियुक्त्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

३) सेवानिवृत्त अधिकाऱ्यास मंत्रालयीन स्तरावरील /निवडणूक आयोग कार्यालयातील निवडणूकविषयक कामकाजाचा अनुभव असावा.

४) शिपाई पदासाठीचे उमेदवार वगळता इतर उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.निवडणूक विषयक कामाचा अनुभव ही वाढीव अर्हता समजण्यात येईल.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने **त्यांचे अर्ज सदर पदाकरिता बेबसाईट वरील माहिती पाहून** suresh.kalaskar@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३९०१/०२२-२२०२८७०७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा . विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावरकार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल . उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यास ४०८, आर्केडिया,४ था मजला, नरिमन पॉईंट, कफ परेड, मुंबई येथे स्थापित होणा-या समितीच्या कार्यालयात काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी सदर समितीचे सदस्य यांच्या नियंत्रणाखाली काम करतील .

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक - संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

*_*_*_*_*_*_*_*_*